

**देवी चंद्रघंटा**
नवरात्रोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी पूजली जाणारी माता दुर्गाची तिसरी शक्ती आहे.


॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

अहिल्यानगर | मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ९९ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com


## वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### समाज

पाणीच नाही जमिनीत
आता काय उरणार?
माणसं जगतील
जनावरे काय करणार?
गोंधळलेला समाज
स्वार्थी बनली व्यवस्था
स्वातंत्र्याच्या काळात
पारतंत्र्याची अवस्था!

# एमपीएससी पेपरफुटीच्या तपासासाठी चौकशी आयोग

## अध्यक्षपदी न्या. भोसले, सचिवपदी तुकाराम मुंढे । एमपीएससी अध्यक्षांचा राजीनामा घेण्यास नकार

**पुणे । वीरभूमी–** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणाचा तपास करण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी आयोगाची स्थापना करण्यात येणार असून, आयोगाच्या अध्यक्षपदी माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांची तर सचिवपदी सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी घोषणा राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी रविवारी केली. यात २ महिन्यांत चौकशी करण्याचा प्रस्ताव असून, आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणे आणि २०२७ मधील गट-क परीक्षेतील पदसंख्या दुप्पट करण्याच्या विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या. परंतु एमपीएससी अध्यक्ष विवेक भीमनवार यांचा राजीनामा घेण्याची मागणी अमान्य केली. दरम्यान, आ. रोहित पवार यांनी भीमनवार यांचा राजीनामा घ्यावा, असे म्हटले.

एमपीएससी अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासह विविध मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी गेल्या ११ दिवसांपासून पुण्यात आंदोलन सुरू ठेवले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीममवार यांचा राजीनामा घ्यावा, ही त्यामधील प्रमुख मागणी आहे. रोहित पवारांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे. विद्यार्थ्यांनी आता हे आंदोलन मागे घ्यावे, यासाठी राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी रविवारी सायंकाळी आ. रोहित पवार आणि आंदोलकांची भेट घेतली. या भेटीनंतर शिवेंद्रराजे यांनी आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेतली आणि मुख्यमंत्री त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक असल्याचे सांगितले आणि आंदोलन स्थगित करावे, असे आवाहन केले. या आयोगाचे कामकाज सुरू असेपर्यंत एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांना



पदावरून दूर करण्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी केली.

शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार पेपरफुटीच्या प्रकरणाचा तपास करण्यासाठी आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. आयोगाच्या अध्यक्षपदी माजी न्या. दिलीप भोसले तर सचिवपदी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्यासह माजी न्यायाधीश पी. डी. नाईक, पोलिस महानिरीक्षक लखमी गौतम, सेवानिवृत्त अधिकारी गणेश पाटील यांचा समावेश आहे, असे सांगत शिवेंद्रराजेंनी सरकारने मान्य केलेल्या मागण्यांचा मसुदा रोहित पवारांकडे सुपूर्द केला. यामध्ये अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याविषयी काही उल्लेख नव्हता. त्यामुळे विवेक भीमनवार यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी रोहित पवारांनी केली.

### सरकार गुन्हे मागे घेणार

आंदोलन करणाऱ्या ज्या-ज्या विद्यार्थांवर गुन्हे नोंद करण्यात आले, ते गुन्हे मागे घेण्याची घोषणा शिवेंद्रराजेंनी केली. तसेच एमपीएससी संदर्भात जे कोणी दोषी आढळतील, त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल, असेही शिवेंद्रराजे म्हणाले. येणाऱ्या काळात गट क पदांसाठी परीक्षा होणार असून त्याच्या संख्येत वाढ होणार असल्याचेही ते म्हणाले.

## SPOT NEWS

### ज्वारी, बाजरी महागणार!

**मुंबई –** राज्यातील दुष्काळाने पालेभाज्यांना फटका बसलेला असतानाच कडधान्य आणि तृणधान्याचे क्षेत्रही लक्षणीय प्रमाणात घटले आहे. विशेषत: खरिपातील ज्वारीसह बाजरी, मूग आणि उडदाच्या पेरणीचे क्षेत्रच ६० टक्क्यांच्या खाली आले आहे. त्यामुळे येत्या हंगामात कडधान्य आणि तृणधान्यांचा तुटवडा जाणवू शकतो. राज्यातील दुष्काळी स्थितीच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने राज्यभरातील पीक पेरणीबाबत तयार केलेल्या अहवालात चिंताजनक बाबी समोर आल्या आहेत. राज्यात सरासरी १४४.३६ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरण्या होतात. यंदा सरासरीच्या ९७ टक्के म्हणजेच १४०.२६ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. मात्र, यातील मोठा वाटा भाताचा ज्याचा शंभर टक्के पेरा झाला आहे. तर, मक्याखालील क्षेत्र १३० टक्के आहे. ज्वारी, बाजरी, मूग, उडदासह अन्य कडधान्ये आणि तृणधान्यांचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर घटले आहे. विशेषत: खरीप ज्वारीचे क्षेत्र फक्त ३४ टक्के इतकेच आहे. तर, बाजरी ५९ टक्के, मूग ५० टक्के आणि उडीद क्षेत्र ५६ टक्के इतकेच आहे. शिवाय, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने खंड दिल्याने पेरणी झालेल्या क्षेत्रातील उत्पादनही घटण्याची शक्यता आहे.

### नवरात्रोत्सवामुळे फुलबाजारात तेजी; झेंडूच्या फुलांना मागणी

**पिंपरी –** घटस्थापनेपासून नवरात्रोत्सवाला सुरुवात झाल्याने फुलबाजारात झेंडूच्या फुलांना मागणी वाढली आहे. बाजारात झेंडू आणि केशरी कलकत्ता यांची मोठी आवक झाली आहे. सध्या फुलांची मागणी वाढल्याने फुल बाजारात तेजी आहे. नवरात्रोत्सवामध्ये घराघरांमध्ये आणि मंडळांमध्ये पूजा अनेकविध धार्मिक कार्यक्रम असतात. फुलबाजारात विड्याची पाने, तुळशीची पाने, कमळाची फुले, झेंडू, शेवंती, बिजलीची फुले यांची आवक मोठया प्रमाणात झाली आहे. घाऊक बाजारात पिवळा गोंडा ६० – ७०, पिवळा कलकत्ता गोंडा ७० रुपये किलो, केशरी गोंडा ४० रुपये, केशरी कलकत्ता ६० रुपये किलो, तुळजापुरी गोंडा ६० रुपये किलो दर होता. शेवंती १५० रुपये, जांभळी शेवंती १०० रुपये, कबूतर शेवंती २०० रुपये, अष्टर १०० रुपयांना ३ जुड्या, लाल गुलाब तुकडा १५० रुपये किलो, कलर गुलाब तुकडा १०० रुपये, डच गुलाब १०० ते १२० रुपये किलो. तिळाची फुल १०० – २०० वाटा, कमळ १० रुपये, निशिगंधा ६०० रुपये किलोने विक्री केली जात आहे.

# डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे कोल्हापूर उत्तरची धुरा!

## पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर भाजपकडून महत्त्वपूर्ण संघटनात्मक जबाबदारी

**अहिल्यानगर । वीरभूमी–** भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्यावर पक्षाने आणखी एक महत्त्वपूर्ण संघटनात्मक जबाबदारी सोपविली आहे. पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर त्यांची कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघाच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी १२ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी केलेल्या नियुक्तीपत्रातून ही घोषणा केली आहे.



डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे यापूर्वीच भाजपाच्या प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी आहे. त्याचबरोबर आयुष्मान भारत प्रकोष्ठच्या प्रभारी जबाबदारीही त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे . आता पुणे शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या अनुषंगाने कोल्हापूर उत्तर विधानसभा प्रभारीपदाची जबाबदारी देण्यात आल्याने त्यांच्या संघटनात्मक कार्यक्षेत्रात आणखी विस्तार झाला आहे.

पक्षाच्या संघटनात्मक रचनेत विविध स्तरांवर जबाबदाऱ्या सोपविताना स्थानिक पातळीवरील समन्वय, कार्यकर्त्यांची बांधणी आणि निवडणुकीचे नियोजन यांना महत्त्व असते. कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघाची प्रभारी म्हणून काम करताना डॉ. सुजय विखे पाटील यांच्यावर या प्रक्रियेत समन्वय साधण्याची जबाबदारी असेल.

भाजपाकडून राज्यातील विविध विधानसभा मतदारसंघांसाठी प्रभारींच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. या यादीत कोल्हापूर उत्तर मतदारसंघासाठी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या नावाचा समावेश आहे. पक्षाने त्यांच्यावर सोपविलेली ही नवी जबाबदारी आगामी निवडणुकीच्या संघटनात्मक नियोजनाच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे.

प्रदेश उपाध्यक्षपद, आयुष्मान भारत प्रकोष्ठची जबाबदारी आणि आता कोल्हापूर उत्तर विधानसभा प्रभारीपद, अशा विविध स्तरांवरील जबाबदाऱ्यांच्या माध्यमातून डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे पक्षसंघटनेने महत्त्वपूर्ण भूमिका सोपविली आहे.

पक्षहिताला प्राधान्य देत संघटनात्मक जबाबदारी पार पाडण्याच्या दृष्टीने ही नियुक्ती महत्त्वाची ठरणार आहे. नव्या जबाबदारीसाठी डॉ. सुजय विखे पाटील यांच्यावर अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे

# अंबाबाई मंदिरात पुजाऱ्यांचे आंदोलन; प्रशासनाच्या हस्तक्षेपावरून वाद

**कोल्हापूर । वीरभूमी–** कोल्हापूरच्या प्रसिद्ध अंबाबाई मंदिरात पुजा-यांनी प्रशासनाच्या भूमिकेविरोधात ठिय्या आंदोलन सुरू केल्याने मंदिर परिसरात एकच विषय सुरु झाला आहे. मंदिरातील धार्मिक विधी, पारंपरिक पूजा आणि प्रशासनाचा हस्तक्षेप या मुद्यांवरून पुजाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. या आंदोलनामुळे मंदिर व्यवस्थापन आणि धार्मिक परंपरांचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

मंदिरातील धार्मिक विधी आणि परंपरांमध्ये प्रशासनाकडून अतिरिक्त हस्तक्षेप केला जात असल्याचा आरोप पुजा-यांनी केला आहे. अशा हस्तक्षेपामुळे पारंपरिक पद्धतीने पूजा करण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रशासनाने धार्मिक परंपरांचा विचार करून निर्णय घ्यावेत, अशी भूमिका आंदोलक पुजा-यांनी घेतली आहे.

या आंदोलनामागे मंदिरातील काही विशिष्ट घटनांचाही संदर्भ असल्याचे सांगितले जात आहे. देवीच्या मूर्तीशी संबंधित तसेच दर्शन व्यवस्थेबाबत घडलेल्या काही प्रसंगांमुळे पुजाऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. याशिवाय, पोलिसांच्या वागणुकीवरही पुजा-यांनी आक्षेप घेतला आहे. कर्मचारी किंवा पोलिसांच्या भूमिकेची दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी पुजाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, या प्रकरणावरून मंदिर परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती हाताळण्यासाठी पोलीस प्रशासन आणि आंदोलक पुजारी यांच्यात चर्चा सुरू असल्याचे समोर आले आहे. या चर्चेतून वादावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जात आहे.

अंबाबाई मंदिर हे कोल्हापूरमधील प्रमुख धार्मिक स्थळ असून, येथे दररोज मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. त्यामुळे मंदिरातील पूजा व्यवस्था, धार्मिक परंपरा आणि भाविकांची सुरक्षितता या बाबींना विशेष महत्त्व आहे. सध्याच्या आंदोलनामुळे मंदिर प्रशासन आणि पुजारी यांच्यातील समन्वयाचा प्रश्नही समोर आला आहे.

आता प्रशासन पुजाऱ्यांच्या मागण्यांवर कोणती भूमिका घेते आणि चर्चेतून हा वाद कसा मिटतो, याकडे कोल्हापूरकरांसह अंबाबाईच्या भाविकांचे लक्ष लागले आहे.

# शेवगाव तालुक्याच्या कन्या ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर काळाच्या पडद्याआड

**मुंबई । वीरभूमी–** अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्याची कन्या असलेल्या मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणीसम्राज्ञी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मधू कांबीकर यांचे पुण्यात निधन झाले. वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आपल्या दमदार अभिनयाने आणि लावणीच्या खास शैलीने त्यांनी अनेक वर्षे प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. त्या मुळच्या शेवगाव तालुक्यातील कांबी येथील आहेत. चित्रपटांमध्ये आई, सासू अशा विविध भूमिका साकारत त्यांनी मराठी मनोरंजनविश्वात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. मात्र, एका लावणीच्या कार्यक्रमादरम्यान आलेल्या पक्षाघाताच्या झटक्यानंतर त्यांच्या आयुष्याला वेगळे वळण मिळाले.

मधू कांबीकर यांनी मराठी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. सहजसुंदर अभिनय, प्रभावी संवाद आणि लावणी सादर करण्याची खास शैली यामुळे त्या प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या. ‘झपाटलेला’, ‘डेबू’, ‘बिनकामाचा नवरा’, ‘माझा छकुला’ आणि ‘एक होता विदूषक’ यांसारख्या चित्रपटांमधून त्यांनी विविध भूमिका साकारल्या. चित्रपटांमध्ये त्यांनी अनेकदा आई आणि सासूच्या भूमिका साकारल्या. अभिनयासोबतच



लावणीसाठी देखील त्यांचे योगदानही उल्लेखनीय होते. त्यामुळे त्या केवळ अभिनेत्री म्हणूनच नव्हे, तर एक कुशल लावणी कलाकार म्हणूनही ओळखल्या जात होत्या.

२७ नोव्हेंबर २०१६ रोजी मुंबईतील माटुंगा येथील यशवंत नाट्यमंदिरात ‘लावण्य संगीत’ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तब्बल १२ वर्षांनंतर मधू कांबीकर या कार्यक्रमातून पुन्हा लावणी सादर करत होत्या. मात्र, कार्यक्रमादरम्यान त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. प्रकृती ठीक नसतानाही त्यांनी जिद्दीने भैरवी सादर केली. पण, त्यानंतर त्यांना मेकअप रूममध्ये त्यांना पक्षाघाताचा झटका आला. या घटनेनंतर त्यांच्या उजव्या हातावर परिणाम झाला आणि त्यांच्या प्रकृतीच्या समस्या आणखी वाढल्या.

२०१८ मध्ये झी चित्र गौरव पुरस्कार सोहळ्यात मधू कांबीकर यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. प्रकृती ठिक नसल्यामुळे त्यांना सोहळ्याला उपस्थित राहता आले नाही. त्यामुळे त्यांच्या सुनेने, शीतल जाधव यांनी त्यांच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. त्यांच्या जाण्याने आज मराठी मनोरंजन विश्वात मोठी पोकळी निर्माण झाली असून त्यांच्यानंतर लावणीच्या एका युगाचा अंत झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

# महायुतीत नाराजीनाट्याची चर्चा

## दुष्काळाच्या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची दांडी

**मुंबई । वीरभूमी–** राज्यात पावसाअभावी दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करण्यात आला असून शेतक-यांसाठी मदत जारी करण्यात आली. दरम्यान राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकासोबत महत्त्वाची बैठक घेतली. मात्र, या बैठकीला राज्याचे दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना सुरुवात झाली आहे. दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी बैठकीचे निमंत्रण देण्यात आले होते की नाही, यावरूनही राजकीय चर्चांना उधाण आले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकासोबत ही बैठक पार पडली. राज्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतीचे नुकसान आणि संभाव्य मदतीच्या उपाययोजनांच्या अनुषंगाने या बैठकीला महत्त्व प्राप्त झाले होते. या बैठकीला आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, तसेच केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकाचे प्रमुख आणि केंद्रीय संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांच्यासह पथकातील सदस्य उपस्थित होते. मात्र, राज्य सरकारमधील महत्त्वाचे घटक असलेल्या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची अनुपस्थिती लक्षवेधी ठरली. त्यामुळे महायुती सरकारमध्ये नेमके काय सुरू आहे, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागल्या आहेत.

या बैठकीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांना निमंत्रण देण्यात आले नव्हते का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे दोन्ही नेते नाराज असल्याचीही चर्चा होत आहे. तसेच, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना बैठकीचे निमंत्रण देण्यात आले होते की नाही, याबाबतही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

दुष्काळासारख्या महत्त्वाच्या विषयावर झालेल्या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्री अनुपस्थित राहिल्याने या प्रकरणाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. दरम्यान शेतक-यांनी फक्त आश्वासन नको तर दिलेला शब्द पाळा आणि लवकरात लवकर दुष्काळग्रस्त शेतक-यांसाठी उपाययोजना लागू करण्याची मागणी केली आहे. तसेच कोकणातील काही जिल्ह्यातील शेतक-यांनी तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी केली आहे. आता शेतक-यांच्या या मागण्या कधी मान्य होणार हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.

# कुंभमेळ्यासाठी मराठवाड्याचे पाणी नाशिकला वळविले

**नाशिक । वीरभूमी–** नाशिक जिल्ह्यातील मुकणे, भाम, वाकी आणि भावली या धरणाचे पाणी दुष्काळग्रस्त मराठवाड्यासाठी आरक्षित केलेले आहे. या चारही धरणांतील एकूण ३८६.१० द.ल.घ.मी. पाणी नांदूर मधमेश्वर कालव्याद्वारे वैजापूर, गंगापूर तालुक्यातील सिंचनासाठी राखीव आहे. परंतु नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी या धरणांतील सुमारे १९०.७९ द.ल.घ.मी. पाण्याचे आरक्षण प्रस्तावित केल्याची धक्कादायक माहिती आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर आणि गंगापूर हे दोन तालुके अवर्षणप्रवण क्षेत्रात मोडतात. यामुळे या तालुक्यांसाठी नाशिक जिल्ह्यात मुकणे, भाम, भावली आणि वाकी ही चार धरणे १९७९ ते २०१६ या कालावधीत बांधण्यात आली. दरवर्षी या धरणात १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध होतो. नांदूर, मधमेश्वर जलद कालव्याद्वारे वैजापूर आणि गंगापूर तालुक्यातील १०२ गावांतील ४३ हजार ८६० हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण झालेले आहे. या चार धरणांतील पाण्यावर मात्र बिगर सिंचनासाठी आरक्षण टाकण्यात आले आहे. या चारही धरणांतील उपयुक्त पाणीसाठा ३८६.१० द.ल.घ.मी. आहे. मात्र गेल्या काही वर्षांत आणि आता सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी धरणातील पाण्याच्या ५० टक्के अर्थात १९०.७९ द.ल.घ.मी. पाण्यावर बिगर सिंचन आरक्षण प्रस्तावित करण्यात आले आहे.

मुकणे धरणाजवळच नाशिक महापालिकेकडून २७४ एमएलडी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारण्याचे काम प्रगतिपथावर आहे. आधीच यंदा पावसाने पाठ फिरवल्याने मागील ८ महिन्यांत ९४५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

मुकणे धरणाऐवजी गंगापूर आणि दारणामधून सिंहस्थ कुंभासाठी पाणी द्यावे, अशी मागणी मराठवाडा समन्यायी पाणी वाटप संघर्ष समितीने केली आहे. समितीच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांना याविषयी निवेदन दिले. याविषयी तातडीने कार्यवाही न केल्यास जनआंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

वैतरणा धरणातून १ टीएमसी पाणी नांदूर मधमेश्वर कालव्याद्वारे वैजापूर, गंगापूर तालुक्यासाठी सोडावे, तसेच नांदूर-मधमेश्वरसाठी मंजूर ८ टीएमसी पाणी देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# SPOT NEWS

## पैशाचे आमिष दाखवून महिलेवर गैरप्रकाराचा प्रयत्न; चौघांविरुद्ध गुन्हा

**● अकोले । वीरभूमी–**

पैशाचे आमिष दाखवून महिलेकडे शरीरसुखाची मागणी केल्याप्रकरणी राजूर पोलिसांनी दोन महिला, एक पुरुष आणि चार अज्ञात इसमांविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. संबंधित महिलेने पुढील प्रकार घडण्यापूर्वी राजूर पोलीस ठाण्यात धाव घेतल्याने तालुक्यात या घटनेची चर्चा सुरू झाली आहे. फिर्यादी महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, ७ ऑक्टोबर रोजी दुपारी अश्विनी भास्कर लेंडे व यशोदा वर्मा या दोघी तिच्या घरी आल्या. नवरात्रासाठी साड्या पाहण्यासाठी सोबत येण्यास सांगून त्यांनी तिला राजूर येथील अश्विनी लेंडे यांच्या घरी नेले. तेथे चार अनोळखी इसम उपस्थित होते. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, तेथे तिची वैयक्तिक माहिती, कुटुंबासंबंधी माहिती आणि आरोग्यविषयक प्रश्न विचारण्यात आले. तिची उंची मोजून ती कागदावर नोंदविण्यात आली. त्यानंतर तिचे हात-पायांचे फोटो व शरीराची व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात आल्याचा आरोप तिने केला आहे. तक्रारीनुसार, यशोदा वर्मा व एका अनोळखी इसमाने तिला पैशांचे आमिष दाखवून कथित 'पूजे'बाबत सांगितले. या प्रक्रियेत शारीरिक संबंध ठेवण्यास सांगण्यात आल्याचा आरोपही फिर्यादीने केला आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात पैसे मिळतील, असे सांगून तिच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे तिने तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान, फिर्यादीने घरी जाण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर अश्विनी लेंडे हिने तिला दवाखान्यापर्यंत सोडले. घरी परतल्यानंतर तिने पती व आई-वडिलांना घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर कुटुंबीयांशी चर्चा करून तिने राजूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून अश्विनी भास्कर लेंडे, भास्कर खंडू लेंडे (दोघेही रा. ग्रामीण रुग्णालयाच्या पाठीमागे, राजूर), यशोदा वर्मा (पूर्ण नाव व पत्ता उपलब्ध नाही) तसेच चार अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास राजूर पोलीस करीत आहेत.

## दातरंगे मळा येथील दत्त कॉलनीत देवीची वाजतगाजत भव्य मिरवणूक

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

दातरंगे मळा येथील दत्त कॉलनीत श्री सूर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान ट्रस्ट आणि निलांबरी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करण्यात येत आहे. नवरात्रोत्सवानिमित्त सबजेल देवी चौक ते दातरंगे मळा अशी देवीची भव्य मिरवणूक वाजतगाजत काढण्यात आली. बँड पथक, सुमधुर देवीगीतांचा गजर आणि महिलांच्या लेझिम पथकाच्या सहभागामुळे मिरवणुकीला पारंपरिक स्वरूप प्राप्त झाले. लहान मुला-मुलींनी धार्मिक व पारंपरिक वेशभूषा परिधान करून मिरवणुकीत सहभाग घेतला. महिला, बालके आणि परिसरातील नागरिकांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. निलांबरी महिला मंडळाच्या वतीने गेल्या पंधरा वर्षांपासून नवरात्रोत्सवाची परंपरा जपली जात आहे. धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना प्राधान्य देत मंडळाने परिसरातील महिला व बालकांना एकत्र आणण्याचे काम केले आहे. उत्सवाच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे जतन करणे, सामाजिक एकोपा वाढविणे आणि नव्या पिढीला पारंपरिक मूल्यांची ओळख करून देणे, हा मंडळाच्या उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत महिला आणि बालकांसाठी संगीत खुर्ची, चित्रकला, लिंबू-चमचा, वेशभूषा आणि वक्तृत्व अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून सहभागी महिलांना आपले कौशल्य दाखविण्याची, तर बालकांना सुप्त कलागुण विकसित करण्याची संधी मिळणार आहे. मुलांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि वक्तृत्वकौशल्य वाढावे, तसेच महिलांचा सांस्कृतिक उपक्रमांतील सहभाग अधिक सक्रिय व्हावा, या हेतूने मंडळाने हा उपक्रम हाती घेतला आहे. धार्मिक उत्सवाबरोबरच मनोरंजन, कला आणि व्यक्तिमत्त्व विकासाला प्रोत्साहन देणाऱ्या या स्पर्धा नवरात्रोत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहेत. यंदाच्या नवरात्रोत्सवात देवीच्या प्रतिष्ठापना स्थळाची वैष्णवी देवी मंदिराच्या प्रतिकृतीवर आधारित आकर्षक सजावट करण्यात आली आहे. मंदिराच्या स्वरूपातील या सजावटीमुळे प्रतिष्ठापना स्थळाला विशेष धार्मिक आणि देखणे स्वरूप प्राप्त झाले आहे. देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांचे ही सजावट लक्ष वेधून घेत आहे. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत दररोज एका कुटुंबाच्या वतीने देवीची आरती करण्यात येणार असून, अष्टमीच्या दिवशी भव्य होमहवनाचे आयोजन करण्यात येणार आहे. गेल्या पंधरा वर्षांपासून धार्मिक परंपरा जपत निलांबरी महिला मंडळ विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबवत आहे. यंदाही देवीची पारंपरिक मिरवणूक, आकर्षक सजावट आणि महिला व बालकांसाठी आयोजित विविध स्पर्धांमुळे दत्त कॉलनीतील नवरात्रोत्सवाला विशेष रंगत प्राप्त झाली आहे. हा नवरात्र उत्सव यशस्वी करण्यासाठी श्री सूर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान ट्रस्ट आणि निलांबरी महिला मंडळाचे सर्व सदस्य प्रयत्न करत आहेत.

# ज्ञानेश्वर कारखान्याचे १३ लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट

### अध्यक्ष माजी आ. नरेंद्र घुले पाटील । ५३ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन व गळीत हंगाम शुभारंभ

**● नेवासा । वीरभूमी –**

यंदाच्या गळीत हंगामात लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याने १३ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले असल्याचे प्रतिपादन कारखान्याचे अध्यक्ष तथा माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांनी केले.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या ५३व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन व ऊस गळीत हंगामाचा शुभारंभ सोमवारी (दि. १२) सकाळी १०.३० वाजता झाला. कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांच्या हस्ते हा सोहळा पार पडला. यावेळी जिल्हा सहकारी बँकेचे संचालक तथा माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, संत ज्ञानेश्वर संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, ॲड. देसाई देशमुख आणि कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यानंतर आयोजित सभेत घुले पाटील बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कारखान्याचे संचालक प्रसाद पटारे व सौ. गौरी पटारे तसेच बॉयलर अटेंडंट संजय नवले व सौ. वैशाली नवले यांच्या हस्ते बॉयलर पूजन करण्यात आले.

संचालक जनार्दन शेळके व सौ. शांताबाई शेळके यांच्या हस्ते ऊस गव्हाण पूजन करण्यात आले. शेतकी ओव्हरशीअर शरद गव्हाणे व सौ. शिल्पा गव्हाणे यांच्या हस्ते ऊस वजनकाट्याचे विधिवत पूजन करण्यात आले.

नरेंद्र घुले पाटील म्हणाले, अल निनोचा परिणाम सर्व देशावर झाला असून त्याला आपणही अपवाद नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाताना एकमेकांना प्रेरणा देत आपल्यातील कौशल्य आणि गुणवत्तेचा वापर या सहकारी संस्थेसाठी जास्तीत जास्त कसा करता येईल, हे आता आपल्या हातात आहे. १३ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करण्याची गरज आहे.




ते पुढे म्हणाले, कोणी कुठेही वजन केले तरी आपल्या वजनकाट्यावरील ऊस वजनात एक किलोचाही फरक पडणार नाही, इतकी अचूकता आपल्या वजनकाट्यात आहे.

पश्चिम वाहिनी नद्यांचे अरबी समुद्रात वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविल्यास कमी खर्चात गुरुत्वाकर्षणाच्या माध्यमातून पाणी उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे नगर, नाशिकसह मराठवाड्यातील दहा जिल्ह्यांचा दुष्काळ कायमस्वरूपी दूर करण्यास मदत होईल, असेही घुले पाटील यांनी सांगितले.

संत ज्ञानेश्वर संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग आणि माजी संचालक ॲड. देसाई देशमुख यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

यावेळी कारखान्याचे माजी संचालक काशिनाथ नवले, पद्माकर मते, शिवाजीराव कोलते, सखाराम लव्हाळे, विष्णू जगदाळे, रावसाहेब निकम, ज्ञानदेव दहातोंडे, चंद्रकांत गरड, विद्यमान संचालक डॉ. नारायण म्हस्के, पंडितराव भोसले, अशोकराव मिसाळ, दत्तात्रय काळे, जनार्दन कदम, मच्छिंद्र म्हस्के, बबनराव भुसारी, ॲड. हिम्मतसिंह देशमुख, अमोल अभंग, विकास नन्नवरे, संतोष पावसे, जनार्दन शेळके, दादासाहेब कोकणे, प्रसाद पटारे, रामनाथ राजपुरे, गोरक्षनाथ भेंडेकर, बाळासाहेब खरड, तज्ज्ञ संचालक रवींद्र नवले, कामगार संचालक सुखदेव फुलारी, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे आणि जनरल मॅनेजर रविंद्र मोटे व्यासपीठावर उपस्थित होते.

माजी जिल्हा परिषद सदस्य दत्तात्रय काळे, माजी पंचायत समिती सदस्य अजित मुरकुटे, घुले पाटील पतसंस्थेचे अध्यक्ष बबनराव धस, डॉ. शिवाजी शिंदे, मोहनराव गायकवाड, गणेश गव्हाणे, नामदेव निकम, बलभीम फुलारी, किसन यादव, संदीप फुलारी, संभाजीराव माळवदे, शेषराव साबळे, बाबूलाल पटेल, दत्तात्रय माळवदे, जनार्दन कदम, भानुदास कावरे, काकासाहेब लबडे, रामदास काळे, नारायण गढेकर, दादा गजरे, बाळासाहेब वाघडकर, अंबादास गोंडे, दत्तात्रय खाटीक, अशोक दुकळे, संभाजी आगळे, बाबासाहेब आगळे, राजू परसय्या, दत्तात्रय विधाटे, आप्पासाहेब देशमुख, सुदाम खाटीक, राम घुमरे, आबासाहेब ताकटे, गोरक्षनाथ बर्गे, संभाजी पवार, दादासाहेब वाबळे, बाबासाहेब आगळे, संतोष म्हस्के, हरिभाऊ नवले, अशोक मेरड, किशोर मिसाळ, ड. रवींद्र गव्हाणे, पुरुषोत्तम सर्जे, सोपान महापूर, भारत गुंजाळ, विनोद ढोकणे, सुभाष म्हस्के, शरद मिसाळ, शंकर निकम, हनुमान पातकळ, गणेश खंबरे, भाऊसाहेब चेके, शहादेव खोसे, तुकाराम विघ्ने, दिलीप कुंढारे, विश्वनाथ मते आणि पोपट मते उपस्थित होते.

तसेच कारखान्याचे मुख्य शेतकी अधिकारी सुरेश आहेर, तांत्रिक सल्लागार एम. एस. मुरकुटे, एस. डी. चौधरी, महेंद्र पवार, भगवंता शेंडगे, सुधाकर ढाकणे, वर्क्स मॅनेजर राहुल पाटील, चीफ इंजिनिअर नंदकुमार चोथे, चीफ केमिस्ट सतीश शिंदे, प्रशासकीय अधिकारी कल्याण म्हस्के, मुख्य लेखापाल रामनाथ गरड, पर्यावरण अधिकारी राजेश वावरे, कामगार अधिकारी बाळासाहेब डोहाळे, लीगल ऑफिसर सुनील शिंदे, राजेंद्र काकडे, नामदेव मुळे, विवेक जगदाळे यांच्यासह सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, विविध संघटनांचे पदाधिकारी, अधिकारी, कामगार व कार्यकर्ते उपस्थित होते.

कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील यांनी प्रास्ताविक केले. भाऊसाहेब सावंत यांनी सूत्रसंचालन केले. संचालक रामनाथ राजपुरे यांनी आभार मानले.

## नवरात्र म्हणजे अंतःकरणातील नकारात्मकता सोडून सदाचाराची साधना : महंत माधव बाबा

**● पाथर्डी । वीरभूमी –**

नवरात्र हा उत्सव केवळ बाह्य उपवासाचा नाही, तर तो अंतःकरणातील आसुरी प्रवृत्तींवर दैवी गुणांचा विजय मिळवण्याचा पवित्र काळ आहे. आदिमाता जगदंबा ही शक्ती आणि करुणेचे मूर्तिमंत रूप आहे. आजच्या भौतिकवादी युगात मानवाने मानसिक शांतता, सदाचार आणि समाधानासाठी अध्यात्माची कास धरणे अत्यंत गरजेचे आहे. माता माऊलीच्या चरणी लीन होताना प्रत्येकाने आपल्यातील अहंकार, द्वेष आणि नकारात्मकता सोडून दिली पाहिजे. समाजकल्याण, परोपकार आणि एकमेकांबद्दल आदर बाळगणे हीच देवीची खरी भक्ती आहे. आई जगदंबा सर्वांना सुख, समृद्धी आणि सुबुद्धी देवो, असे मार्गदर्शन शंकर बाबा मठाचे महंत माधवबाबा यांनी केले.



शारदीय नवरात्रोत्सवाच्या पवित्र पर्वावर श्रीक्षेत्र मोहटादेवी चे मनोभावे पुजन केल्यानंतर त्यांनी भाविकांशी संवाद साधत होते. यावेळी महंत माधव बाबा यांनी आदिमाता जगदंबा माता मोहटादेवीचे विधिवत पूजन केले आणि मनोभावे दर्शन घेतले.

यावेळी महंत माधवबाबा यांनी शंकरबाबा देवस्थानच्या वतीने, मोहटादेवी देवस्थान समितीचे नव्यानेच अध्यक्ष झालेले धर्मदाय उप आयुक्त नवनाथ जगताप यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला व त्यांना पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विश्वस्त ॲड. प्रसन्न दराडे, ॲड. विक्रम वाडेकर, ॲड. कल्याण बडे, अशोक दहिफळे, शशिकांत दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, शुभम दहिफळे, बाळूशेट लाहोटी, राजेंद्र शिंदे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे उपस्थित होते.

## धनुर्विद्येत ऋतुपर्णचा 'सुवर्णवेध'; यशार्थची रौप्यभरारी!

### जिल्हास्तरीय शालेय स्पर्धेत मढेवडगावच्या न्यू इंग्लिश स्कूलचे घवघवीत यश

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

अचूक लक्ष्यभेद करत ऋतुपर्ण अमोल साळवे याने सुवर्णपदकाला गवसणी घातली, तर यशार्थ अमोल साळवे याने रौप्यपदकाची कमाई केली. नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती पब्लिक स्कूलमध्ये ९ ऑक्टोबर रोजी झालेल्या जिल्हास्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, मढेवडगावच्या या साळवे बंधूंनी उल्लेखनीय यश मिळवत शाळेचा नावलौकिक वाढविला.



स्पर्धेतील १७ वर्षांखालील मुलांच्या गटात इयत्ता दहावीतील ऋतुपर्णने रिकर्व्ह राउंड प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. तर १४ वर्षांखालील गटात इयत्ता सहावीतील यशार्थने द्वितीय क्रमांक मिळविला. दोघांनीही आपल्या अचूक नेमबाजीने आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर हे यश संपादन केले. विशेष म्हणजे, या दोन्ही खेळाडूंनी यंदा प्रथमच १० मीटर एअर पिस्तूल शूटिंग प्रकारातही सहभाग नोंदवून आपल्या क्रीडाकौशल्याची झलक दाखविली.

दोन्ही खेळाडूंना आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक अभिजीत दळवी यांचे मार्गदर्शन लाभत असून, क्रीडाशिक्षक नवनाथ पवार आणि वडील अमोल साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली ते नियमित सराव करतात. योग्य प्रशिक्षण, जिद्द आणि मेहनतीच्या बळावर मिळविलेल्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत भर पडली आहे.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, क्रीडा अधिकारी प्रियंका खिंडरे, सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे, गुणवत्ता कक्ष विभागप्रमुख काकासाहेब वाळुंजकर, देणगीदार रविंद्रराव महाडिक, मुख्याध्यापक हौसराव दांगडे, पर्यवेक्षक विलास सुलाखे, तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांनी अभिनंदन केले.

## राष्ट्रीय शाळा सुरक्षा धोरणांतर्गत बाबूजी आव्हाड महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

**● पाथर्डी । वीरभूमी–**

येथील बाबूजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय शाळा सुरक्षा धोरणांतर्गत तसेच राष्ट्रीय सेवा योजना +२ स्तर विभागाच्या वतीने 'आपत्ती व्यवस्थापन व सज्जता' या विषयावर विशेष व्याख्यान व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी शरदचंद्र पवार विद्यालय, तिसगाव येथील विद्या कावरे यांनी विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. भूकंप, वीज पडणे, आग लागणे अशा नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तींच्या प्रसंगी घ्यावयाची काळजी, प्रथमोपचार, सुरक्षित ठिकाणी जाण्याचे मार्ग तसेच अफवांवर विश्वास न ठेवण्याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी सांगितले की, प्रत्येकाच्या जीवनात कधी ना कधी आपत्तीजन्य परिस्थिती उद्भवू शकते. अशा वेळी प्रत्येक युवक हा जबाबदार स्वयंसेवकाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनाचे ज्ञान प्रत्येक विद्यार्थ्याला असणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. आशा पालवे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सुरेखा चेमटे यांनी, तर आभार प्रदर्शन प्रा. मन्सूर शेख यांनी केले. यावेळी प्रा. अरुण नेहूल, प्रा. सचिन पालवे, प्रा. राठी, प्रा. शेखर ससाणे, प्रा. महारुद्र घुले, प्रा. आम्रपाली कांबळे व प्रा. सचिन वनवे उपस्थित होते.



प्रशिक्षणादरम्यान आपत्ती उद्भवल्यास त्याचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध उपाययोजनांची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. विद्यार्थ्यांनी या प्रात्यक्षिकांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# पाथर्डीत अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांची धडक कारवाई; ६० लाखांचा मुद्देमाल जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईत डंपर, ट्रॅक्टर आणि जेसीबी ताब्यात; सहा जणांविरुद्ध पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी तालुक्यातील हनुमान टाकळी आणि कासार पिंपळगाव परिसरात सुरू असलेल्या कथित अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पाथर्डी पोलिसांच्या मदतीने धडक कारवाई केली. या कारवाईत वाळूने भरलेले डंपर, ट्रॅक्टर तसेच जेसीबी जप्त करण्यात आली असून, जप्त मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे ६० लाख ३० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अहिल्यानगर येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पाथर्डी तालुक्यात गस्त घालत असताना हनुमान टाकळी आणि कासार पिंपळगाव शिवारात वाळूची बेकायदा वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी संबंधित परिसरात सापळा रचून कारवाई केली.

पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असता वाळूने भरलेली वाहने आढळून आली. वाहनचालकांकडे वाळू वाहतुकीचा आवश्यक परवाना आहे का, याची चौकशी करण्यात आली. मात्र, आवश्यक परवाना नसल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी वाहने ताब्यात घेत पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली.

पंचांच्या उपस्थितीत वाहनांची तपासणी करण्यात आली. यामध्ये वाळूने भरलेले डंपर व ट्रॅक्टर तसेच वाळू उपसा व वाहतुकीसाठी वापरली जात असल्याचा आरोप असलेली जेसीबी यंत्रणा आढळून आली. वाहनांमधील वाळूची पाहणी करून संबंधित वाहने आणि इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी वैभव बंडू डांगे (वय २२, रा. डांगेवाडी), ऋषिकेश अंकुश मोरे (वय २८), बंडू शिवाजी बर्डे (वय ४५), सोमनाथ जगन्नाथ डांगे (वय २८), सतीश एडके (रा. पाथर्डी) आणि प्रवीण उत्तम शिरसाट (वय २१, रा. हनुमान टाकळी) यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

दाखल फिर्यादीनुसार, जप्त करण्यात आलेल्या वाहनांमध्ये वाळूने भरलेले डंपर, ट्रॅक्टर आणि जेसीबीचा समावेश आहे. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे ६० लाख ३० हजार रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

शासनाची परवानगी न घेता अवैध वाळूची वाहतूक केल्याच्या आरोपावरून संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये तक्रार नोंदविण्यात आली आहे.



जप्त वाहने आणि मुद्देमाल पुढील कायदेशीर कारवाईसाठी पाथर्डी पोलीस ठाण्यात आणण्यात आला आहे. अवैध गौणखनिज उत्खनन आणि वाहतुकीबाबत पुढील तपास पाथर्डी पोलीस करत आहेत.

या कारवाईमुळे पाथर्डी तालुक्यातील अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. गौणखनिजाच्या अवैध उत्खननाला आणि वाहतुकीला आळा घालण्यासाठी प्रशासनाकडून सातत्याने कारवाई होण्याची गरज असल्याची चर्चा परिसरात आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## श्री रेणुकामाता मंदिरासमोरील दुभाजकावर १५० झाडांची लागवड

**अहिल्यानगर । वीरभूमी –**
धार्मिक उत्सवांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचा स्तुत्य उपक्रम एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टच्या वतीने राबविण्यात आला आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिरासमोरील रस्त्याच्या दुभाजकावर तब्बल १५० झाडांची लागवड करण्यात आली असून, या उपक्रमामुळे मंदिर परिसर हिरवाईने बहरला आहे. केवळ वृक्षारोपण करून न थांबता या झाडांच्या संगोपनाची आणि संवर्धनाची जबाबदारीही देवस्थान ट्रस्टने स्वीकारली आहे. एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थानमध्ये दरवर्षी नवरात्रोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. शहरातील रस्त्यांच्या दुभाजकांवर झाडे लावल्यामुळे परिसराचे सौंदर्य वाढण्यास मदत होते. त्याचबरोबर झाडांच्या योग्य संगोपनातून पर्यावरणाचा समतोल राखण्यासही हातभार लागतो. या उद्देशाने देवस्थान ट्रस्टने मंदिरासमोरील दुभाजकावर १५० झाडांची लागवड केली. मंदिर परिसरात निर्माण झालेली हिरवाई भाविक आणि नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. वृक्षारोपणासोबतच झाडांना नियमित पाणी देणे आणि त्यांचे संगोपन करणे यासाठीही ट्रस्टने पुढाकार घेतला आहे. या सामाजिक उपक्रमाला आमदार संग्राम जगताप यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी स्वतः झाडांना पाणी घालून वृक्षसंवर्धनाच्या कार्यात सहभाग नोंदविला. यावेळी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, नवनाथ कातोरे, संपत बारस्कर यांच्यासह अनेक मान्यवर आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्येष्ठ कवयित्री हेमलता गिते यांचा राष्ट्रीय साहित्यरत्न पुरस्काराने गौरव

**अहिल्यानगर । वीरभूमी –**
येथील ज्येष्ठ कवयित्री तथा माजी प्राचार्या हेमलता प्रदीप गिते यांना भारतीय सारस्वत मंडळाच्या वतीने राष्ट्रीय साहित्यरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबईतील अंधेरी येथे आयोजित राष्ट्रीय लेखणी मराठी साहित्य संमेलनात त्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. संमेलनाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्रभूषण साहित्यिक श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. सौ. सबनीस आणि सौ.सकटे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. या साहित्य संमेलनाला भारतीय सारस्वत मंडळाचे अध्यक्ष सुरेशजी सकट यांच्यासह साहित्य, कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मराठी साहित्याचा उत्कर्ष साधणे, भारतीय साहित्यपरंपरेला अधिक बळकटी देणे आणि साहित्यिकांच्या सर्जनशील कार्याला प्रोत्साहन देणे, या उद्देशाने भारतीय सारस्वत मंडळ कार्यरत आहे. साहित्यिकांच्या योगदानाची योग्य दखल घेऊन पुरस्कारांच्या माध्यमातून त्यांच्या कार्याचा गौरव करणे, हा मंडळाच्या उपक्रमांचा महत्त्वाचा भाग आहे. हेमलता प्रदीप गिते या मराठी साहित्यविश्वात संवेदनशील, अभ्यासू आणि प्रभावी कवयित्री म्हणून परिचित आहेत. आपल्या लेखणीतून त्यांनी विविध सामाजिक, मानवी आणि भावनिक विषयांना सातत्याने अभिव्यक्ती दिली आहे. त्यांच्या कवितांमध्ये मानवी नात्यांतील गुंतागुंत, जीवनातील विविध अनुभव, सामाजिक जाणिवा आणि भावविश्वाचे प्रतिबिंब दिसून येते. कवितेच्या माध्यमातून मानवी मनाचा वेध घेताना सामाजिक वास्तवाचे भान जपणे, ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्यपूर्ण बाजू मानली जाते. त्यांच्या साहित्यामध्ये भावनांची सहजता, आशयाची खोली आणि जीवनाकडे पाहण्याचा संवेदनशील दृष्टिकोन जाणवतो. त्यामुळे त्यांच्या कविता वाचकांबरोबरच श्रोत्यांनाही भावतात.

## पारनेर येथे २० व्या आंतर जिल्हा राष्ट्रीय ॲथलेटिक्स निवड चाचणी

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
अहिल्यानगर जिल्हा थलेटिक्स संघटनेच्या वतीने आयोजित २० व्या आंतर जिल्हा राष्ट्रीय ॲथलेटिक्स-अहिल्यानगर जिल्हा संघ निवड चाचणी (२०२६) पारनेर येथील 'न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज'च्या मैदानावर नुकतीच मोठ्या उत्साहात पार पडली. या निवड चाचणीतून जिल्ह्याचे राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्यासाठी १३ गुणवंत खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. या निवड चाचणीचे उद्घाटन अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कॉलेजचे क्रीडा संचालक प्रा. डॉ. संजय गायकवाड, एनसीसी विभागप्रमुख प्रा. भरत डगळे, प्रा. गंगाराम खोडदे सर, न्यू इंग्लिश स्कूलचे क्रीडा प्रमुख तथा तालुका शालेय क्रीडा अध्यक्ष बापूराव होळकर सर, एम.ई.टी. स्कूलचे फिजिकल डायरेक्टर अक्षय शिंदे, आणि स्टेला मारीस हंगाचे ऋषीकेश औटी आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेचे पंच व व्यवस्थापक म्हणून श्रीरामसेतू आवारी, संदीप घावटे, गुलजार शेख, बापूसाहेब गायकवाड, सौरभ वरखडे, समीर शेख, गणेश आघाडे, सतीश भालेराव आणि अरविंद दिवे यांनी चोख काम पाहिले.

# साई संस्थानच्या ४८८ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवाकायमीचा मार्ग मोकळा?

### उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे पुढील प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा । राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पाठपुराव्याची चर्चा

**शिर्डी । वीरभूमी–**
श्री साईबाबा संस्थानमधील ४८८ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवाकायमीच्या प्रश्नाला महत्त्वपूर्ण वळण मिळाले असून, छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे त्यांच्या सेवेत कायम होण्याच्या प्रक्रियेतील कायदेशीर अडथळे दूर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सेवेत कायम होण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी हा निर्णय दिलासादायक मानला जात आहे. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.



श्री साईबाबा संस्थानमध्ये अनेक वर्षांपासून शेकडो कर्मचारी कंत्राटी पद्धतीने कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा विषय यापूर्वीच धोरणात्मक स्तरावर विचाराधीन होता. मात्र, त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय, आर्थिक आणि कायदेशीर बाबींमुळे हा प्रश्न न्यायालयीन प्रक्रियेत गेला होता. संस्थानच्या वतीने यासंदर्भात छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती.

कर्मचाऱ्यांच्या सेवाकायमीचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसोबतच्या चर्चांमधून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. तसेच, न्यायालयीन प्रक्रियेत कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक भूमिका मांडली जावी, यासाठीही त्यांनी प्रयत्न केले.

दरम्यान, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनीही या प्रश्नाकडे लक्ष देत कर्मचारी संघटना, संस्थान प्रशासन आणि संबंधित शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून पाठपुरावा केला होता. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात झालेल्या बैठकांमध्ये सहभागी होत, त्यांच्या सेवाकायमीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याची भूमिका त्यांनी घेतली होती. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर सकारात्मक निर्णय व्हावा, यासाठी विखे पाटील पिता-पुत्रांनी सातत्याने प्रयत्न केल्याचे सांगितले जात आहे.

उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे ४८८ कर्मचाऱ्यांच्या सेवाकायमीसंदर्भातील पुढील प्रक्रिया मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निर्णयामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. सेवेत कायम होण्याबरोबरच नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे सुविधा आणि लाभ मिळण्याच्या दृष्टीनेही या निर्णयाला महत्त्व प्राप्त झाले आहे. तथापि, सेवाकायमीची प्रत्यक्ष अंमलबजावणी न्यायालयाच्या आदेशातील अटी आणि संस्थान प्रशासनाच्या पुढील कार्यवाहीवर अवलंबून राहणार आहे.

या प्रश्नासाठी कर्मचारी संघटनांनीही वेळोवेळी बैठका घेऊन आपली भूमिका मांडली होती. संस्थान प्रशासन, आस्थापना विभाग आणि विधी विभागाच्या स्तरावरही या प्रकरणाची प्रक्रिया सुरू होती. आता उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे या प्रदीर्घ प्रश्नाच्या निराकरणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासह संस्थानच्या तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा प्रधान जिल्हा न्यायाधीश शिवाजीराव कचरे, जिल्हाधिकारी तथा समिती सदस्य डॉ. पंकज आशिया, संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे, संबंधित प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे लक्ष वेधले जात आहे.

४८८ कर्मचाऱ्यांच्या सेवाकायमीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आता न्यायालयीन आदेशानुसार पुढील प्रशासकीय कार्यवाही किती वेगाने पूर्ण होते आणि कर्मचाऱ्यांना सेवाकायमीचे प्रत्यक्ष लाभ कधी मिळतात, याकडे संबंधित कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांचे लक्ष लागले आहे.

## पाथर्डीतील वामनभाऊ नगरमधील पाच ते सहा व्यक्तींना भगरीतून विषबाधा झाल्याचा संशय

**पाथर्डी । वीरभूमी–**
शहरातील काही विक्रेत्यांकडे निकृष्ट दर्जाचे भगरीचे पीठ विकले जाऊन या पिठाचे सेवन केल्याने वामनभाऊ नगर मधील पाच सहा जणांना विषबाधा झाल्याची प्राथमिक माहिती आहे. याबाबत शासकीय वैद्यकीय सूत्रां कडे अधिकृत माहिती उपलब्ध नाही. अन्न व औषध प्रशासनाने शहरातील विविध दुकानांमधील भगरीचे नमुने व पिठाचे नमुने तपासण्याची गरज आहे.



अनेक गावांमध्ये देवी मंदिरांमधून अथवा सेवेकर्यांची सेवा म्हणून मोफत फराळ केंद्र सुरू असतात. यामध्ये साबुदाणा खिचडी, भगर व केळी बहुतेक ठिकाणी वितरित केली जाते. केळी सुद्धा कृत्रिम रित्या पिकविलेली असतात.

दैनंदिन आहाराचे वेळापत्रक बदलल्याने व अचानक आहारात बदल झाल्याने अनेकांना आम्लपित्त, अपचन असाही त्रास होतो. शनिवारी रात्री बाधित कुटुंबातील सर्वांनीच बाजारातील उपवासाचे रेडिमेड पीठ आणून त्याच्या भाकरी खाल्ल्या. पहाटेच्या वेळी सर्वांनाच जुलाब, मळमळणे उलट्या, चक्कर येणे, असा त्रास सुरू झाला. संबंधित कुटुंबातील व्यक्तींनी तातडीने फॅमिली डॉक्टर कडून उपचार घेतले. यापैकी एक दोन जणांनी शेवगाव रस्त्यावरील मोठ्या हॉस्पिटलमधून उपचार घेतले. सर्वांची प्रकृती सुधारल्याने त्यांना संबंधित डॉक्टरांनी डिस्चार्ज दिला.

अन्यत्र भगर महाग असताना शहरात काही विक्रेत्यांकडे स्वस्त दरातील सुट्टी भगर विकली जाते. शासकीय सूत्रानुसार काही ठिकाणी भगरीमध्ये कोद्रा नावाच्या भगरी सदृश पदार्थ मिसळला जातो. दळण्यासाठी शक्यतो कमी भावातील भगर वापरली जाते. तयार पीठ मिळते म्हणून बाजारातून भगर आणून दळण्याच्या भानगडीत कोणी सहसा पडत नाही. भगर दळताना त्यामध्ये काही ठिकाणी अल्प प्रमाणात साबुदाणा मिसळला जातो. अन्न व औषध प्रशासनाने याची वेळीच दखल घेऊन तपासणी करण्याची गरज आहे. रुग्णांवर उपचार केलेल्या डॉक्टरांनी रुग्ण आता बरे झाले. किरकोळ प्रकार होता. नाव टाकण्याची गरज नाही. असा सल्ला दिला. मोठा गंभीर प्रकार उद्भवणे अगोदर अशा प्रकारांची गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. तपासणीनंतर यामागील सत्य उजेडात येणार असले तरी ज्या कुटुंबाने भगरीचे पीठ खाल्ले, त्याचे नमुने व तयार भाकरीचे नमुने आता शिल्लक राहिले नाहीत. नमुने तपासणीनंतरच संबंधित कुटुंबाला नेमका कशाचा त्रास झाला याची माहिती स्पष्ट होणार आहे.

## पत्रकारांना एक लाख रुपयांचे अपघाती विमा कवच; अभिनव उपक्रम : सहाय्यक बीडिओ संदीप दळवी

**कोपरगाव । वीरभूमी–**
लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांना वृत्तांकनासाठी ऊन, वारा, पाऊस यांची पर्वा न करता कर्तव्य बजावावे लागते. बहुतांश पत्रकारांचा प्रवास दुचाकीवरून होत असल्याने प्रवासादरम्यान अपघाताची शक्यता असते. अशा वेळी उपचारांचा मोठा खर्च तसेच कुटुंबाची होणारी धावपळ लक्षात घेता महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने तालुक्यातील पत्रकारांना देण्यात आलेले अपघाती विमा कवच हा निश्चितच अभिनव उपक्रम आहे, असे गौरवोद्गार कोपरगाव पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी संदीप दळवी यांनी काढले.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे व जिल्हा निवड समितीचे अध्यक्ष सोमनाथ काळे यांच्या मार्गदर्शनाखाली, कोपरगाव तालुकाध्यक्ष प्रा. विजय कापसे यांच्या संकल्पनेतून तालुक्यातील ५० हून अधिक पत्रकारांचा प्रत्येकी एक लाख रुपयांचा अपघाती विमा काढण्यात आला आहे. या विमा संरक्षणासह संघटनेच्या ओळखपत्रांचे वाटप नुकतेच जिल्हा सरचिटणीस जनार्दन जगताप यांच्या अध्यक्षतेखाली तसेच गोदामाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष आदिनाथ ढाकणे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले यावेळी दळवी बोलत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष प्रा. विजय कापसे यांनी केले. त्यांनी संघटनेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची तसेच संघटनेच्या कार्यविस्ताराची माहिती दिली. आदिनाथ ढाकणे यांनी संघटनेच्या उपक्रमांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष जनार्दन जगताप यांनी संघटनेची माहिती देत ओळखपत्राचे महत्त्व व फायदे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका सचिव विनोद देवरे यांनी केले, तर आभार प्रमोद पवार यांनी मानले. यावेळी शहराध्यक्ष हफिज शेख, कचरू लोहकरे, संजय लाड, रहीम पठाण, विशाल लोंढे, मिलिंद विघे, महेश गायकवाड, योगेश रुईकर, अनिल दीक्षित, सुनील ससाणे, योगेश डोखे, सोमनाथ डफळ, रवी वाघडकर, राजेंद्र तासकर, सतीश जाधव, अक्षय काळे, अमोल गायकवाड, शहाबाज कुरेशी आदी तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते.

## आबासाहेब काकडे यांचे शैक्षणिक कार्य चिरंतन प्रेरणादायी : माजी प्राचार्य सुनील आढाव

**शेवगाव । वीरभूमी –**
सर्वसामान्यांच्या जीवनाला दिशा देऊन त्यांच्या प्रगतीचा मार्ग सुकर व्हावा आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाज सुदृढ व्हावा, या उदात्त हेतूने कर्मयोगी आबासाहेब काकडे यांनी प्रतिकूल परिस्थितीत शैक्षणिक कार्याचा पाया रचला. त्यांनी दूरदृष्टीने उभारलेली शैक्षणिक चळवळ आणि त्यांचे कार्य भावी पिढ्यांना चिरंतन प्रेरणा देत राहील, असे प्रतिपादन माजी प्राचार्य सुनील आढाव यांनी केले.

कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिक्षण समूहाच्या वसतिगृहात आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी आबासाहेब काकडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी रवींद्र कुटे, वसतिगृह अधीक्षक नवनाथ फटांगरे आणि सुरक्षा अधिकारी मेजर नवनाथ गरड उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आढाव म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिस्त, संस्कार आणि संस्कृतीचे पालन करून सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर विविध क्षेत्रांत आपली गुणवत्ता सिद्ध करावी. ज्ञान, कर्तृत्व आणि चारित्र्य यांच्या जोरावर जीवनात यशस्वी होणे, हीच कर्मयोगी आबासाहेब काकडे यांना खरी आदरांजली ठरेल.

आबासाहेबांनी त्या काळात शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या निवासाची गरज ओळखून वसतिगृहांची उभारणी केली. आजही या वसतिगृहांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आणि त्यांची शैक्षणिक वाटचाल पाहता, त्यांच्या दूरदृष्टीची प्रचिती येते. शिक्षण हे केवळ वैयक्तिक प्रगतीचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, हा त्यांचा विचार आजही संस्थेच्या कार्यातून पुढे जात असल्याचे आढाव यांनी नमूद केले.

शिक्षण समूहाचे अध्यक्ष ड. विद्याधर काकडे आणि हर्षदाताई काकडे हे आबासाहेबांचा शैक्षणिक वारसा पुढे नेत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचा विस्तार झाला असून, सीनियर कॉलेज, डी.एड., बी.एड., डी.फार्मसी, बी.फार्मसी, बीसीएस, कोटा एक्सलन्स, हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज तसेच सीबीएसई स्कूल अशा विविध शैक्षणिक शाखांमधून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी



उपलब्ध होत आहेत. हा विस्तार आबासाहेबांनी रुजवलेल्या शैक्षणिक विचारांचा आणि दूरदृष्टीचा प्रत्यय देणारा आहे, असेही आढाव यांनी सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांतून कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या कार्याचा आणि कर्तृत्वपूर्ण जीवनप्रवासाचा आढावा घेत त्यांना आदरांजली वाहिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजित झिरपे यांनी केले, तर आभार नवनाथ फटांगरे यांनी मानले.

# 'सौर संवाद २०२६' यात्रेचे अहिल्यानगरात उद्घाटन

### महाराष्ट्र सौर ऊर्जेच्या वापरात प्रगतीपथावर : गोपाल काबरा । ग्रामीण भागात उद्योजकता व रोजगाराच्या संधी पोहोचविण्यासाठी उपक्रम

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
सौर ऊर्जेबाबत जनजागृती करण्यासह या क्षेत्रातील उद्योजकता आणि रोजगाराच्या संधी ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्यासाठी गोपाल काबरा फाउंडेशन आणि जीके एनर्जी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सौर संवाद २०२६' यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. १२ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत ही यात्रा राज्यातील विविध शहरांतून प्रवास करणार असून, सोमवारी (ता. १२) अहिल्यानगर येथे यात्रेचा शुभारंभ झाला. त्यानंतर ही यात्रा संभाजीनगर येथे पोहोचली.

यात्रेदरम्यान सौर ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ, व्यावसायिक आणि इच्छुक उद्योजकांशी संवाद साधण्यात येणार आहे. मंगळवारी (ता. १३) नाशिक व धुळे, १४ ऑक्टोबरला बुलढाणा व अमरावती, १५ ऑक्टोबरला भंडारा व चंद्रपूर, १६ ऑक्टोबरला वाशीम, नांदेड व लातूर, तर १७ ऑक्टोबरला सोलापूर व कोल्हापूर येथे संवाद साधला जाणार आहे. १८ ऑक्टोबरला पुणे येथे यात्रेचा समारोप होईल. या उपक्रमाद्वारे राज्यातील ३४ जिल्ह्यांतील इच्छुक उद्योजकांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट आहे.

उद्घाटनप्रसंगी जीके एनर्जीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गोपाल काबरा म्हणाले, सौर ऊर्जेचा वापर केवळ वीज निर्मितीपुरता मर्यादित न ठेवता त्यातून स्थानिक व्यवसाय, रोजगार आणि आर्थिक संधी निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. युवक आणि महिलांना सौर ऊर्जा क्षेत्रातील व्यवसायाच्या संधींची माहिती देऊन उद्योजकतेसाठी प्रोत्साहित करण्यात येणार आहे. एक हजारांहून अधिक इच्छुक उद्योजकांना सक्षम करण्याचे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

केंद्र व महाराष्ट्र शासनाने सौर ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी जाहीर केलेल्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठीही ही यात्रा उपयुक्त ठरेल, असे काबरा यांनी सांगितले. भारतात सौर ऊर्जेच्या वापराच्या बाबतीत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर असल्याचेही त्यांनी नमूद केले.

घरगुती छतावरील सौर यंत्रणा, व्यावसायिक सौर प्रकल्प, सौर कृषिपंप, ऊर्जा साठवण, सौर यंत्रणा बसविणे, देखभाल आणि वितरण अशा विविध क्षेत्रांतील व्यवसायाच्या संधींची माहिती यात्रेत दिली जाणार आहे. विक्री, सेवा आणि तांत्रिक कामांच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर व्यवसाय कसा सुरू करता येईल, याबाबत व्यावहारिक मार्गदर्शनही करण्यात येईल.





सौर ऊर्जेच्या माध्यमातून जिल्हास्तरावर उद्योजकांचे जाळे निर्माण करणे, स्थानिक रोजगाराच्या संधी वाढविणे आणि पर्यावरणपूरक ऊर्जेचा प्रसार करणे हा या यात्रेचा व्यापक उद्देश आहे. सौर ऊर्जा क्षेत्रातील अनुभव व ज्ञान इच्छुक उद्योजकांपर्यंत पोहोचवून त्यांना शाश्वत व्यवसाय उभारण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# कर्मवीर शंकरराव काळे कारखाना पहिली उचल ३२०० रुपये देणार

## आ. आशुतोष काळे । कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचा गाळप हंगाम शुभारंभ कार्यक्रम

**• कोपरगाव । वीरभूमी–**

**कर्मवीर शंकररावजी काळे साहेबांनी नेहमीच ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित जपले आहे. त्यांची शिकवण माजी आमदार अशोकराव काळे यांनी पुढे सुरु ठेवली.त्याच आदर्श विचारांवर आपली वाटचाल सुरु असून ऊस दराच्या बाबतीत कोण काय निर्णय घेईल याची वाट न पाहता दुष्काळी परिस्थिती आहे, शेतकरी अडचणीत आहेत याचा विचार करून २०२६–२७ च्या गाळप हंगामात गाळपाला येणाऱ्या ऊसाला पहिली उचल प्र.मे.टन ३,२०० रुपये देणार व जानेवारी नंतर गाळपास येणाऱ्या ऊसाला देखील विशेष अनुदान देणार असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी जाहीर केले. यावेळी उपस्थित सभासद शेतकऱ्यांनी टाळ्यांच्या गजरात या निर्णयाचे स्वागत करून दुष्काळी परिस्थितीची दखल घेवून विशेष अनुदान जाहीर केल्याबद्दल आ. आशुतोष काळे यांचे आभार मानले.**

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२६–२७ या वर्षाच्या ७२ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ रविवार (दि.११) रोजी घटस्थापनेच्या मुहूर्तावर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक व मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे व त्यांच्या सुविद्य पत्नी जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ.पुष्पाताई काळे यांच्या हस्ते विधिवत पूजन करून चेअरमन आ.आशुतोष काळे यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळ व मान्यवरांच्या हस्ते गव्हाणीत ऊसाची मोळी टाकून करण्यात आला याप्रसंगी आ.आशुतोष काळे बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, राज्य शासनाने जरी १५ ऑक्टोबरला गळीत हंगाम सुरु करण्यास सांगितले असले तरी परिस्थिती अनुकूल नव्हती.ऊसाची वाढ न झाल्यामुळे अपेक्षित रिकव्हरी मिळणार नाही त्यामुळे शेतकरी आणि कारखाना दोघांचेही नुकसान होणार असल्यामुळे ऊस अधिक परीपक्व व्हावा व गळीत हंगाम १५ ऑक्टोबर ऐवजी १५ नोव्हेंबर नंतरच सुरु व्हावा असे वाटत होते.परंतु पावसाच्या बाबतीत हवामान विभागाकडून देण्यात येणारी माहिती आणि वाढलेली उष्णता पाहता पुढे आणखी अडचणी वाढण्याची शक्यता असल्यामुळे १५ ऑक्टोबरला गळीत हंगाम सुरु करण्याचा निर्णय योग्य वाटतो. चालूवर्षी एल निनोचे सावट असल्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रात फक्त जुलै महिन्यातच पाऊस पडला याउलट मागील वर्षी मे पासून नोव्हेंबर पर्यंत पाऊस पडत होता. त्यामुळे मागच्या आणि चालू हंगामात परस्पर विरोधी परिस्थिती आहे. राज्य सरकारने ३५८ पैकी २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे. दुष्काळग्रस्त तालुक्यांत ट्रिगर–१ लागु झाला असून दुष्काळाच्या पार्श्वभुमीवर योग्य त्या उपाय योजना देखील तात्काळ सुरु करण्यात आल्या आहेत. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून पाण्याचा काटकसरीने वापर करावा.पाण्याची उपलब्धता लक्षात घेवून उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. यावर्षी कमी वाढ झालेल्या उसाचे खोडवे राखून पुढील वर्षी गाळपासाठी पीक उपलब्ध होईल, याकडे लक्ष द्यावे. नवीन उसाची लागवड करून कमी पाण्याचा वापर करावा व अधिक उत्पादन घेण्यावर भर द्यावा.ऊस पिक वाचवण्यासाठी शेतात आधुनिक सिंचन प्रणालीचा वापर करून ऊस पाचटाचे आच्छादन करावे, ए–आय तंत्रज्ञानाचा आधार घेवून ठिबक सिंचन, स्प्रिंकलर यांचा वापर वाढवावा असे आवाहन केले. गोदावरी कालव्यांचे दोन रोटेशन देण्यात येणार असल्याचे जलसंधारण मंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांनी सुतोवाच केलेले असले तरी प्रत्यक्षात पुढील परिस्थिती कशी असेल हे आज सांगता येणार नाही.

त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही यासाठी पहिली उचल जरी प्र.मे.टन रुपये ३,२००/–देण्यात येणार असली तरी १ ते १५ जानेवारी दरम्यान गाळपाला येणाऱ्या ऊसाला प्र.मे.टन रुपये १००/–, १५ ते ३१ जानेवारी दरम्यान गाळपाला येणाऱ्या ऊसाला प्र.मे.टन रुपये १५०/–,१ ते १५ फेब्रुवारी दरम्यान गाळपाला येणाऱ्या ऊसाला प्र.मे.टन रुपये २००/– आणि त्यानंतर गाळपाला येणाऱ्या ऊसाला प्र.मे.टन रुपये २५०/– विशेष अनुदान देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देवून कर्मवीर शंकरराव काळे यांनी घालून दिलेल्या आदर्शांचा वारसा जपत, माजी आमदार अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली दुष्काळाच्या कठीण परिस्थितीचा सर्वांच्या सहकार्याने धैर्याने सामना करून अधिकाधिक ऊस गाळप करून यंदाचा गळीत हंगाम यशस्वी करू असे आ.आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले.




याप्रसंगी कारखान्याचे उपाध्यक्ष दिनार कुदळे, तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते राजेंद्र जाधव, पद्माकांत कुदळे, बाळासाहेब कदम, नारायणराव मांजरे, ज्ञानदेव मांजरे, बाबासाहेब कोते, संभाजीराव काळे, सोमनाथ चांदगुडे, बाळासाहेब जपे, संचालक प्रवीण शिंदे, सूर्यभान कोळपे, सुधाकर रोहोम, दिलीपराव बोरनारे, डॉ.मच्छिंद्र बर्डे, राजेंद्र घुमरे, शंकरराव चव्हाण, सचिन चांदगुडे, श्रीराम राजेभोसले, राहुल रोहमारे, अनिल कदम, अशोक मवाळ, सुनील मांजरे, मनोज जगझाप, वसंतराव आभाळे, प्रशांत घुले, सौ. वत्सलाबाई जाधव, सौ.इंदूबाई शिंदे, गंगाधर औताडे, श्रावण आसने, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनीचे कार्यकारी संचालक दौलतराव मोरे, गौतम केनचे कार्यकारी संचालक सुभाष गवळी, कारखान्याचे कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनिल कोल्हे, आसवनी विभागाचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, सेक्रेटरी बाबा सय्यद, असि. सेक्रेटरी संदीप शिरसाठ, चीफ इंजिनिअर निवृत्ती गांगुर्डे, चिफ केमिस्ट सुर्यकांत ताकवणे, शेतकी अधिकारी निळकंठ शिंदे, उद्योग समुहातील सर्व संलग्न संस्थांचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक, पदाधिकाऱ्यांसह सभासद, शेतकरी, कर्मचारी, व राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनरल मॅनेजर सुनिल कोल्हे यांनी केले तर उपाध्यक्ष दिनार कुदळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पारनेर तालुक्यातील पीक नुकसानीवर सरसकट कर्जमाफीची मागणी

## खरीप-रब्बी पिकांचे मोठे नुकसान । पाणीटंचाईसह जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर : शंकर नगरे

**• पारनेर । वीरभूमी–**

पारनेर तालुक्यात खरीप आणि रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर पंचनाम्यांच्या प्रक्रियेत विलंब न करता शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी. तसेच शरदचंद्र पवार केंद्रीय कृषिमंत्री असताना करण्यात आलेल्या कर्जमाफीच्या धर्तीवर पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शंकर नगरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.



नगरे म्हणाले की, पारनेर तालुक्यात खरीप हंगामातील पिकांचे अतोनात नुकसान झाले असून त्याचा फटका रब्बी हंगामालाही बसला आहे. सध्या खरीप पिकांचे पंचनामे सुरू आहेत. मात्र, कृषी विभागाचे अधिकारी, तलाठी तसेच महसूल विभागाचे कर्मचारी वेळेवर पंचनाम्यासाठी शेताच्या बांधावर पोहोचत नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. खरीप नुकसानीचे पंचनामे पूर्ण होण्यास विलंब होत असताना रब्बीच्या नुकसानीचे पंचनामे कधी होणार आणि शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत कधी मिळणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

तालुक्यात मूग, सोयाबीन, वाटाणा, कांदा, ज्वारी यांसारख्या पिकांचे नुकसान झाले आहे. दुसरीकडे, पावसाच्या अनिश्चिततेमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. कांदा लागवडीनंतर पुरेसा पाऊस न झाल्याने पिकासाठी पाण्याची व्यवस्था करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. मात्र, पाण्याची कमतरता कायम राहिल्यास कांद्याच्या वाढीवर आणि उत्पादनावर परिणाम होण्याची भीती आहे. आधीच खरीप आणि रब्बी हंगामात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांवर नव्या संकटाची भर पडत असल्याचे नगरे यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या पिकांसोबतच जनावरांच्या चारा आणि पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. टंचाई आढावा बैठकीत पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून जनावरांची अचूक संख्या उपलब्ध झाली नसल्याचा मुद्दा उपस्थित करत शासनाने जनावरांसाठी चारा आणि पाण्याचे योग्य नियोजन करावे, अशी मागणी नगरे यांनी केली.

नागरिकांनाच पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळत नसताना जनावरांची तहान कशी भागवायची, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

पारनेर शहरातील पाणीटंचाईचे चित्र मांडताना नगरे यांनी सांगितले की, शहरातील काही भागांत आठ–आठ दिवस पाणी मिळत नाही. दररोज सुमारे साडेचार लाख लिटर पाण्याची मागणी असताना शासनाकडून टँकरद्वारे सुमारे दोन लाख लिटर पाणीपुरवठा होत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे मागणी आणि पुरवठ्यात मोठी तफावत निर्माण झाली असून पाणीपुरवठ्याचे नियोजन तातडीने सुधारण्याची गरज आहे.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी वारंवार पंचनाम्यांच्या प्रक्रियेत अडकवण्याऐवजी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने मदत द्यावी. शरदचंद्र पवार केंद्रीय कृषिमंत्री असताना करण्यात आलेल्या कर्जमाफीच्या धर्तीवर पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा लाभ देऊन त्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा करावी, अशी मागणी नगरे यांनी केली.

तसेच चारा डेपो, जनावरांसाठी पाणी आणि नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात. पीक नुकसान, कर्जाचा भार आणि पाणीटंचाई अशा संकटांत सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देऊन न्याय द्यावा, असे आवाहन शंकर नगरे यांनी शासनाला केले.

# आधुनिक शेतीत व्यवस्थापनातूनच दर्जेदार उत्पादन शक्य !

## डॉ. पोपटराव खंडागळे : टेके पाटील ट्रस्टच्यावतीने रब्बी हंगाम शेती कार्यशाळा उत्साहात

**• कोपरगाव । वीरभूमी–**

हवामान बदल आणि तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर ऊस पीक वाचवण्यासाठी उसाच्या दोन्ही बाजूंना 'रांगोळी पद्धतीने' ताग किंवा ढेंच्याची पेरणी करावी. ४५ ते ५० दिवसांनंतर ते पीक शेतातच आच्छादल्यास (मल्चिंग) जमिनीतील ओलावा टिकून राहतो, बाष्पीभवन कमी होते आणि जमिनीला सेंद्रिय खताचा मोठा पुरवठा होतो, त्याचबरोबर आधुनिक शेती, खत व्यवस्थापन, पीक संरक्षण आणि विविध पिकांची लागवड या बाबी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. या सर्वांच्या उत्तम व्यवस्थापनातूनच दर्जेदार उत्पादन शक्य असल्याचे निफाड कृषी संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. पोपटराव खंडागळे यांनी दिला.

कोपरगाव तालुक्यातील वारी येथील राहुल (दादा) मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्ट, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कोपरगाव



यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.१०) हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. स्व.राहुल टेके यांच्या प्रतिमेचे पूजन करून या कार्यशाळेची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रकाशराव गोर्डे होते.

यावेळी पोहेगाव मंडळाचे मंडळ अधिकारी सुनील घारकर यांनी राज्य व केंद्र शासनाच्या कृषी विभागाअंतर्गत येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ट्रस्टचे अध्यक्ष पत्रकार रोहित टेके यांनी केले.

डॉ. खंडागळे म्हणाले, कोणत्याही प्रकारची खते जमिनीत वरच्यावर न टाकता ती जमिनीत रितवून आणि मुरवून, मातीत मिसळून दिली पाहिजेत. कांद्याचे उत्पादन घेत असताना पहिल्या तीन पाण्यामध्ये औषधांची फवारणी करावी आणि शेवटी निवोशी किंवा कतार वापरून शेवटची फवारणी करावी. कांदा काढणी करताना शेंडी मोठी ठेवल्यास त्याची साठवणूक क्षमता वाढते.

याप्रसंगी कृषी अधिकारी मनीषा पांगरेकर, मधुकर टेके, अनिल गोरे, अण्णासाहेब टेके, नानासाहेब गाडगे, विशाल टेके, अक्षय टेके, रामेश्वर ठोंबरे, वाल्मीक गोर्डे, तान्हाजी थोरमीसे, नंदू जाधव, बाळासाहेब काथे, साहेबराव घुमरे, अशोक मलिक, जालिंदर शिरसाठ, ऋषिकेश मलिक, आकाश निळे, बाबासाहेब थोरमिसे, विलास गोंडे, शुभम गाडगे, सखाहरी सोळशे, खंडू वानखेडे, कल्याण टेके, गणेश काथे, संजय थोरात, साईनाथ मोरे, उत्तम वाकचौरे, जितेंद्र टेके, सुरज टेके, स्वप्निल टेके, अनिरुद्ध जाधव यांच्यासह शेतकरी उपस्थित होते. यावेळी ट्रस्टच्यावतीने चहा व अल्पोपाराची व्यवस्था करण्यात आली होती.

या मार्गदर्शन शिबिराचा परिसरातील प्रयोगशील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला असून, शेतीविषयक तांत्रिक अडचणी दूर होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन हभप विनायक महाराज टेके यांनी तर गोरख टेके यांनी आभार मानले.

# निघोज येथे बैलपोळ्याची उत्साहात मिरवणूक

## मळगंगा देवीच्या बैलाला मानाचा बहुमान । ढोल-ताशे, भंडाऱ्याची उधळण



**• निघोज । वीरभूमी–**

निघोज येथे बैलपोळा उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत टाकळी ढोकेश्वर येथील 'माईल सिंगर पार्टी'च्या बँजो पथकाने उत्साहाची भर घातली. मळगंगा देवीच्या बैलपोळ्याची मिरवणूक वेशीपासून दुपारी ४ वाजता काढण्यात आली. मिरवणूक पाहण्यासाठी ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

मळगंगा देवीचा जयजयकार करीत, भंडाऱ्याची मुक्त उधळण आणि फटाक्यांची आतषबाजी करत मिरवणुकीला मोठी रंगत आली. वेशीपासून मागील पेठमार्गे मळगंगा मंदिराजवळ मिरवणूक पोहोचल्यानंतर बैलपोळ्याचे देवीचे पुजारी सुनील गायखे व महिला भगिनींच्या हस्ते बैलाचे पूजन करण्यात आले. यावेळी बैलाला पोळीचा नैवेद्य दाखवून औक्षण करण्यात आले.

त्यानंतर मिरवणूक जुनी पेठ, ग्रामपंचायत चौक, संदीप पाटील चौक मार्गे पुन्हा वेशीपर्यंत आणण्यात आली. तेथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

मळगंगा देवीच्या बैलाला या मिरवणुकीत मानाचा बहुमान दिला जातो. त्यामुळे बैलपोळ्याची ही मिरवणूक पाहण्यासाठी पंचक्रोशीतील हजारो नागरिक दरवर्षी गर्दी करतात.

मळगंगा देवी यात्रा समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, पदाधिकारी, उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊली वरखडे, यात्रा समितीचे सदस्य तसेच ग्रामस्थांनी बैलपोळा उत्साहात साजरा करण्याबाबत चार दिवसांपूर्वी बैठक घेतली होती. सध्या शेतीच्या कामांसाठी ट्रॅक्टरसारखी यांत्रिक साधने मोठ्या प्रमाणावर वापरली जात असल्याने बैलांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे पारंपरिक बैलपोळ्याची मिरवणूक मोठ्या उत्साहात काढण्याचा निर्णय यात्रा समिती व ग्रामस्थांनी घेतला.

पूर्वीच्या धार्मिक रूढी–परंपरा जतन करून सण उत्साहात साजरे करण्याचा निर्णय यात्रा समितीने घेतल्याने यंदाची बैलपोळ्याची मिरवणूक लक्षवेधी ठरल्याची प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे. सुमारे अडीच तास चाललेल्या या मिरवणुकीदरम्यान गावात मोठी गर्दी झाली होती.

# कळसूबाई मित्र मंडळाची ३० वर्षांची परंपरा कायम

## कळसूबाई शिखरावर घटस्थापना । तीन दशकांपासून नवरात्रीत दररोज शिखर सर करून मातेची आराधना

**• अकोले । वीरभूमी–**

इगतपुरी तालुक्यातील घोटी येथील कळसूबाई मित्र मंडळाच्या गिर्यारोहकांनी महाराष्ट्रातील सर्वोच्च कळसूबाई शिखरावर घटस्थापना करून तब्बल ३० वर्षांची परंपरा यंदाही अखंडितपणे जोपासली. इ.स. १९९७ पासून मंडळाचे गिर्यारोहक नवरात्रीत घटस्थापना करून विजयादशमीपर्यंत नऊ दिवस उपवास करीत दररोज कळसूबाई शिखर सर करून शिखरस्वामिनी कळसूआईची मनोभावे पूजा व आरती करतात.

कळसूबाई मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भगीरथ मराडे यांच्या नेतृत्वाखाली मंडळाचे गिर्यारोहक आपापले व्यवसाय, कामधंदे आणि प्रपंच सांभाळत गेल्या तीन दशकांपासून हा अनोखा ट्रेकिंगचा छंद अविरतपणे जोपासत आहेत.

या आगळ्यावेगळ्या उपक्रमाची दखल घेत 'राजा शिवछत्रपती' मालिकेतील जिजाऊफेम प्रसिद्ध मराठी अभिनेत्री व दिग्दर्शिका मृणाल कुलकर्णी यांनी नवरात्रीच्या पूर्वसंध्येला घोटी येथे घटकलशाचे पूजन करून तो मंडळाच्या गिर्यारोहकांकडे सुपूर्द केला. कळसूबाई मातेप्रती गिर्यारोहकांच्या असलेल्या भक्तीचे कौतुक करून त्यांनी मंडळाला नवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी मंडळाच्या गिर्यारोहकांनी मृणाल कुलकर्णी यांनी नवरात्रीत कळसूबाई मातेच्या दर्शनासाठी अवश्य यावे, अशी विनंती केली. त्याला त्यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला.

नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी मंडळाच्या गिर्यारोहकांनी पहाटे कळसूबाई



शिखर सर केले. शिखरस्वामिनी कळसूआईचे मनोभावे पूजन व आरती करून उगवत्या सूर्याच्या किरणांच्या साक्षीने सर्वोच्च शिखरावर घटस्थापना करण्यात आली.

कळसूबाई शिखरावर एक दिवस जाऊन परतल्यानंतरही अनेकांना थकवा जाणवतो. मात्र, कळसूबाई मित्र मंडळाचे गिर्यारोहक कोणतीही तक्रार न करता गेल्या ३० वर्षांपासून नवरात्रीच्या काळात सातत्याने हा उपक्रम राबवत आहेत. त्यांच्या या भक्तीच्या शक्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या धाडसी व स्तुत्य उपक्रमात कळसूबाई मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भगीरथ मराडे, अभिजित कुलकर्णी, रामदास चौधरी, कुंडलिक भोपे, निलेश पवार, प्रवीण भटाटे, डॉ. महेंद्र आडोळे, सुधाकर तांबे, भाऊसाहेब जोशी, कैलास नवले, बाळू भोईर, भगवान तोकडे, ज्ञानेश्वर मांडे, अशोक हेमके, बाळू आरोटे, नाना टाकळकर, भगीरथ म्हसने, नामदेव जोशी, सागर पलटणे, कृष्णा गहिले, गुरुनाथ आडोळे, देविदास पाखरे, राजेंद्र माने, संजय शेवाळे यांच्यासह असंख्य गिर्यारोहक सहभागी झाले.

तीस वर्षांपूर्वी नवरात्रीत कळसूबाई शिखरावर भाविक प्रामुख्याने पाचवी आणि सातवी माळेला मातेच्या दर्शनासाठी जात असत. मात्र, १९९७ पासून कळसूबाई मित्र मंडळाने घटस्थापनेपासून विजयादशमीपर्यंत दररोज कळसूआईची मनोभावे आरती करण्यास सुरुवात केली. त्यामुळे आता कळसूबाई शिखरावर नवरात्रीच्या नऊ दिवसांत यात्रेचे स्वरूप आले आहे.

> या काळात भाविक व पर्यटकांची मोठी गर्दी वाढल्याने परिसरातील स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. पुढील काळातही हा उपक्रम सातत्याने सुरू ठेवण्याचा निर्धार कळसूबाई मित्र मंडळाने केला आहे.
>
> – **भगीरथ मराडे,** संस्थापक अध्यक्ष, कळसूबाई मित्र मंडळ, घोटी